


## अरण्यात रमणारा
## पक्ष्यांना अभय देणारा
## आधुनिक ऋषी

# डॉ. सालिम अली

**प्रकाश गोळे**

एखाद्या क्षेत्रात एका व्यक्तीचं कार्यच एवढं मोठं असतं की, ती व्यक्ती काळाच्या पडद्याआड गेली की, एक पोकळी जाणवू लागते. काही वेळा मात्र असंही घडतं की ती महान् व्यक्ती जाते, पण तिने आपल्या पाठीमागे कार्य परंपरा, पायंडे आणि कार्यकर्ते यांचा एवढा मोठा वारसा ठेवून दिलेला असतो की, वैयक्तिक हानी जाणवली तरी कार्यात मुळीच खंड पडत नाही.

सालिम अलींच्या बाबतीत या दोन्ही गोष्टींचा प्रत्यय आल्याशिवाय रहात नाही. सालिम अलींच्या निधनानं माझ्यासारख्या त्याच्या असंख्य निकटवर्तियांना पोकळी जाणवू लागली आहेच. कित्येकांना आपल्या डोक्यावरचं छतच कोसळल्याची जाणीव होतीच, तर कित्येकांना साधेपणा, अहंतेचा पूर्ण अभाव आणि विनोदी, मिश्किल, सर्वांना हवंहवंसं असं व्यक्तिमत्त्व कायमचं नाहीसं झाल्याची चुटपुट लागून राहणार आहे. पण त्याचबरोबर सालिम अलींनी निर्माण केलेल्या परंपरा, त्यांनी आत्मसात आणि लोकप्रिय केलेली अभ्यासाची पद्धत आणि आखून दिलेली दिशा पुसून जाणार नाही, असं समाधानही आज वाटतंय.

सालिम आलींच्या निधनापूर्वी काही तासच मी त्यांना भेटलो होतो. गेले काही महिने त्यांची प्रकृती बरीच ढासळली होती. कर्करोग सावकाश त्यांच्या इंद्रियांचा कब्जा घेत असल्याचं दृश्य आम्हाला पाहवत नव्हतं. एकेकाळची काटक, कणखर शरीरयष्टी कमालीची कृश झाली होती. अलीकडे तर त्यांना चालणही अशक्य झालं होतं. या स्थितीतून त्यांची सुटका व्हावी असाही विचार मनात आल्याशिवाय रहात नव्हता. पण सालिम अलींची प्रबळ इच्छाशक्ती, जीवनावरची आसक्ती आणि श्रद्धा ज्यांना ठाऊक होती, त्यांना माहीत होतं की, व्याधीला सहजासहजी शरण जातील तर ते सालिम कसले! मी त्यांना भेटायला गेलो तो अशा संमिश्र भावनेनं.

आणि माझी निराशा झाली नाही. शरीर थकलं तरी त्यांचं मन तल्लख होतं. मी बरोबर नेलेल्या गुलाबाच्या फुलांचं सौंदर्य त्यांनी नेहमीच्याच रसिकतेनेनं टिपलं. नुकतीच चीनमध्ये पार पडलेली पक्षी-निरीक्षकांची परिषद त्यांच्या मनात घोळत असावी. तिथं काय काय घडलं, काय ठरलं, याची त्यांनी चौकशी केली. मी तिथं जो निबंध वाचला, तो जाणून घेण्याची इच्छा प्रदर्शित केली. आणि तिथं दिसलेल्या पक्ष्यांविषयी चर्चाही केली. शरीर नष्ट होऊ लागलं तरी मन (किंवा आत्मा म्हणा) अविनाशी आहे, असं आपण हिंदू लोक म्हणतो, त्याचाच प्रत्यय सालिम अलींशी बोलताना मला आला.

मी मुंबईहून पुण्याला परतलो आणि थोड्यात वेळात सालिम अलींचं शरीर पंचत्वात विलीन झाल्याची वार्ता कानी पडली. मला त्या देहाचं, त्या स्नायूंचं आणि हाडांचं आणि त्यांना वेढून टाकणाऱ्या धमन्यांचं कौतुक वाटल्याशिवाय राहिलं नाही. त्यांच्या सतत पुढे झेपावणाऱ्या मनाला या शरीरानं शेवटपर्यंत साथ दिली. वयाच्या ऐंशीव्या वर्षी लडाखच्या दुर्गम पहाडात क्रौंच पक्ष्याचा शोध घेण्याच्या मोहिमेचं नेतृत्व जेव्हा त्यांच्याकडे आलं, तेव्हा याच शरीरानं हसत हसत ते आव्हान स्वीकारलं. वयाच्या ब्याऐंशीव्या वर्षी अंदमानच्या जंगलात भटकण्याची सुरसुरी जेव्हा त्यांच्या मनाला आली, तेव्हाही याच शरीरानं त्यांची साथसंगत केली. जवळपास साऱ्या जीवनभर डॉक्टर या व्यक्तीला दूर ठेवण्यात हेच शरीर यशस्वी झालं. मला आठवतं, सालिम अलींचं वय लक्षात घेऊन सरकारने आमच्या मोहिमेबरोबर एका डॉक्टरचीही रवानगी केली होती. पण या संपूर्ण मोहिमेत या डॉक्टरला काही कामच पडलं नाही आणि त्याचा निरूद्योग हा आम्हा सर्वांच्या थट्टेचा विषय झाला होता. आपलं जीवितकार्य संपत आल्याची जाणीव जेव्हा त्या मनाला होऊ लागली, तेव्हाच त्यांच्या शरीराला भूमीचा आधार घ्यावासा वाटला.



**भरतपूर पक्षी अभयारण्य : सालिम अली यांचं अपत्य**

माझी खात्री आहे की, ह्या शेवटच्या क्षणी कोणतीच रुखरुख त्यांच्या मनात राहिली नसणार. एक कर्तत्वसंपन्न आणि कृतार्थं असं जीवन सालिम अली जगले. त्यांनी मनाशी योजलेले लेखनसंकल्प पूर्ण झाले होते. आत्मचरित्राद्वारे त्यांनी आपला जीवन-पट उलगडून ठेवला होता. भारतीय पक्षी-शास्त्राची इमारत भक्कम पायावर उभी राहिल्याचं त्यांनी पाहिलं. ज्या संस्थेसाठी त्यांनी आयुष्य वेचलं, त्या संस्थेच्या कार्याचा राष्ट्रात आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरही विस्तार झाल्याचं भाग्य त्यांनी अनुभविलं आणि आपल्या संकल्पना तडीस नेण्यास आपले असंख्य मित्र, चाहते आणि चेले बद्ध-परिकर आहेत, हे समाधान त्यांना मिळालं. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरचे असंख्य मानसन्मान आणि गौरव त्यांच्या, न मागताही पायाशी येऊन पडले; याचा अभिमान कदाचित त्यांच्यापेक्षा हे सन्मान अर्पण करणाऱ्या जगाला अधिक वाटला असेल.

मोठ्या माणसाच्या बाबतीत पुष्कळदा उपस्थित केला जाणारा प्रश्न सालिम अलींच्या वाट्यालाही आल्याशिवाय राहिला नाही. हा प्रश्न म्हणजे 'सालिम अलीनंतर कोण ?' पण माझ्यासारख्याला हा प्रश्न गौण वाटतो, कदाचित सालिम अलीसारखी व्यक्ती आता पुन्हा होणार नाही, ही गोष्टच भारतीय पक्षीशास्त्राची शैशवावस्था संपून प्रौढावस्था सुरू झाल्याची निदर्शक म्हणावी लागेल. एकमेव असा सालिम अली आता कदाचित निर्माण होणार नाही. पण त्या एकमेव सालिमापासून स्फूर्ती घेतलेले कित्येक छोटे सालिम आज आपल्या देशाच्या जंगलांतून पक्ष्यांच्या मागे हिंडताहेत, पहाडात फिरताहेत, वाळवंट तुडविताहेत– पक्षी निरीक्षणासाठी, पक्ष्यांची छायाचित्रं घेण्यासाठी आणि पक्ष्यांचा अभ्यास करण्यासाठी सालिम अलींनी जेव्हा पक्ष्यांचा अभ्यास सुरू केला होता, तेव्हा हा छंद भारतातल्या युरोपीय रहिवाशांपुरताच मर्यादित होता. त्यांचं अनेक बाबतीत अनुकरण करणारे आमचे संस्थानिक, पक्षीनिरीक्षण ही सुद्धा एक फॅशन मानीत असत. त्यापैकी काहींना खंदे पक्षी-निरीक्षक बनविण्यात सालिम अलींची या शास्त्रावरची दृढ श्रद्धा कारणीभूत झाली असावी. मात्र विद्यापीठे आणि शिक्षण-संस्थांच्या प्रयोगशाळेत बसलेल्या ढुड्ढाचार्यांनी सालिम अलींकडे आणि त्यांच्या या पुस्तकी शिक्षणाला न जुमानणाऱ्या छंदा-कडे तुच्छतेनंच पाहिलं. पण १९६० साला-नंतर पक्षी-निरीक्षण हा छंद तरुण मनाची झपाट्यानं पकड घेत चालल्याच समाधान सालिमना मिळालं आणि या तरुणवर्गाला त्यांचा हार्दिक पाठिंबाही मिळाला.

मला आठवतं, १९७३ साली कन[illegible]ला मी जेव्हा पहिलं निसर्ग-निरीक्षण शिबिर घेतलं, तेव्हा निसर्गशिक्षणाचा आता हिरिरीनं पुरस्कार करणाऱ्या संस्थांचाही पाठिंबा मला मिळाला नाही. पण सालिम जातीनं या शिबिराला हजर राहिले, आमच्यात मिसळले, आमच्याबरोबर कर्नाळा किल्ला चढून गेले आणि त्यांच्या साधेपणानं, निगर्वी स्वभावानं साऱ्यांना जिंकून गेले. शेवटपर्यंत त्यांचा पिंड तरुण माणसाचाच राहिला. त्यामुळे सालिम अलींच्या कार्याची धुरा वाहण्यास त्यांच्या-पासून स्फूर्ती घेतलेले असंख्य तरुण-तरुणी आज सज्ज आहेत.

पक्ष्यांच्या अभ्यासाविषयी १९३० सालच्या नंतर तरुण सालिमच्या मनात जी चलबिचल झाली, तशीच कदाचित आज असंख्य तरुण पक्षी-निरीक्षकांच्या मनात होत अ[illegible]. १९२०-३० सालापूर्वी पक्ष्यांचा अभ्यास हा मेलेल्या पक्ष्यांच्या नमुन्याभोवती घोटाळत होता. रानात, डोंगरात जाऊन असे नमुन्याचे पक्षी गोळा करायचे, प्रयोगशाळेत ते आणून त्यांच्या पिसांची, अवयवांची, तपासणी आणि मोजणी करायची आणि विशिष्ट कुलाचे लेबल त्यांना डकवून द्यायचे. या व्यापापेक्षा जिवंत पक्ष्यांच्या, निसर्गातल्या हालचाली पहाणं, त्या अभ्यासणं, त्यांतून त्यांच्या जीवनपद्धतीचं चित्र उभं करणं, हे तरुण सालिमला आणि त्याच्याबरोबरच्या काही सहाध्यायांना मह-त्वाचं वाटलं. पक्ष्यांच्या जीवनपद्धतीच्या अभ्यासाला शास्त्रीय मानमान्यता या त्यावेळच्या तरुण मंडळींनी मिळवून दिली.

आज पुन्हा एकदा पक्षीशास्त्र चौफुल्यावर उभं आहे. पक्ष्यांच्या जीवनपद्धतीची माहिती मिळवणं अजूनही महत्त्वाचं निश्चितच आहे. पण आता आर्थिक विकासाच्या मार्गावर घोड-दौड करणाऱ्या आपल्या देशातली नैसर्गिक परिस्थिती इतकी झपाट्यानं बदलत चालली आहे की, असंख्य पक्ष्यांची जीवनपद्धती ज्यांवर अवलंबून आहे अशा त्यांच्या निवासाच्या जागाच झपाट्याने नष्ट होऊ घातल्या आहेत. या जागा ( हॅबिटॅट ) वाचविल्याशिवाय पक्षी आणि त्यांची जीवनपद्धती वाचणार नाही. पक्षी निवासाचा अभ्यास हे पक्षी–शास्त्राला मिळालेले नवीन वळण आहे आणि या नव्या रस्त्यानं जायचं की, सालिम अलींच्या रस्त्यानं जायचं अशा मनाच्या काही[illegible] संभ्रमित अवस्थेत पुष्कळसे तरुण पक्षी-निरीक्षक आहेत. सालिम अलींची दूर-दृष्टी हीच की, या नवीन वळणाचा अंदाज त्यांना यापूर्वीच आला होता आणि स्वतःच्या पद्धतीनं त्याची परीक्षा केल्यानंतर त्यांनी ते मनोमन स्वीकारलंही होतं.

निसर्ग-संरक्षणाच्या भारतातील चळवळीला पाठिंबा देण्यापूर्वी त्यांच्या मनात त्यामागील तात्त्विक बैठक पक्की झाली होती.

सुदैवाने याच सुमारास राष्ट्रपतींनी त्यांना राज्यसभेवर नियुक्त केले. राज्यसभेत निसर्ग-संरक्षणाच्या कार्याचा जोरदार पाठपुरावा करण्याचा मनोदय त्यांनी माझ्याजवळ बोलून दाखविला होता. विशेषतः स्थानिक जंगलं तोडून टाकून त्या जागी धनिक किंवा कार-खानदार यांच्याच केवळ उपयोगी पडणारी साग किंवा निलगिरीची जंगलं निर्माण कर-ण्याच्या उद्देशानं स्थापन झालेल्या फॉरेस्ट डेव्हपलमेंट कॉर्पोरेशन्सना त्यांचा तीव्र विरोध होता. या महामंडळांचं धोरण असं होतं की, त्यामुळे सर्वसामान्य जनतेचा लाकूड फाटा, इंधन आणि चाराच नष्ट झाला असता वन्य प्राणी आणि पक्षी यांनाही साग–निलगिरीची जंगलं प्रतिकूल ठरली असती. या महामंडळांचे धोरण आमूलाग्र बदलले पाहिजे असे सालिम अलींचे मत होते. मोठ्या प्रमाणावर जमीन बुडते आणि नैसर्गिक परि-स्थितीत धोकादायक बदल होतो, म्हणून त्याबाबतही त्यांचं मत अनुकूल नव्हतं. दुर्दैवाने राजकीय पातळीवर कार्य करण्यास पुरेसं प्रकृतिस्वास्थ्य त्यांना लाभलं नाही.

पक्षी–निरीक्षण आणि निसर्ग संरक्षण या दोन्हीही गोष्टी जनताभिमुख आणि लोकप्रिय झाल्याचं पाहण्याचं भाग्य मात्र त्यांना लाभलं

एखादं शास्त्र जेव्हा सर्वसामान्य जनतेच्या मनाला स्पर्श करतं, जनताभिमुख बनतं. त्यावेळी जनताही त्या शास्त्रातल्या देवतेच्या, ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाच्या शोधात असते. पक्षीशास्त्र आणि निसर्गसंरक्षण या क्षेत्रात सालिम अलींच्या रूपानं अशी देवतास्वरूप, ऋषितुल्य मूर्ती जनतेला गवसली होती. सालिम अलींच्या जीवनाचे यश यातच सामावलेले आहे,

□

**प्रकाश गोळे**
१ ब अभिमानश्री सोसायटी,
पुणे ८

**वाघिणीचे दूध प्यालो**
**आम्ही बच्चे फाकडे !**



**तुमचा बच्चा असाच शक्तिमान, निर्भय व्हायलाच हवा**
**त्यासाठी त्याला अंगावरच पाजा**
**'आईच्या' दुधाला पर्याय नाही !**

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, महाराष्ट्र शासन, नायडू हॉस्पिटल कंपाऊंड, पुणे १

## सालिम अली – पारितोषिके आणि सन्मान

१९५३ – एशियाटिक सोसायटीचे **जॉय गोविंद लॉ मेडल.**

१९५८ – भारतीय पक्षीशास्त्रातील विशेष सेवेबद्दल '**पद्मभूषण**'.
अलीगढ विद्यापीठातर्फे '**डॉक्टर ऑफ सायन्स**' पदवी.

१९६७ – ब्रिटिश पक्षीशास्त्र संस्थेतर्फे **युनियन गोल्ड मेडल.**

१९६९ – जॉन सी फिलीप्स मेमोरिअल अॅवॉर्ड.

१९७० – **सुंदरलाल होरा मेमोरिअल मेडल.** 'इंदिरा नॅशनल सायन्स अॅकॅडमीचे पारितोषिक

१९७२ – दिल्ली युनिव्हर्सिटीकडून '**डॉक्टर ऑफ सायन्स**' पदवी.

१९७६ – वन्यजीवन संवर्धनासाठी असलेले **जे पॉल घेट्टी** आंतरराष्ट्रीय अॅवॉर्ड.

१९७६ – **पद्मविभूषण**

१९७८ – **डॉक्टर ऑफ सायन्स** आंध्र युनिव्हर्सिटीकडून.

१९७९ – इंडियन नॅशनल सायन्स अॅकॅडमीचे '**सी. व्ही. रामन**' पारितोषिक.

१९८२ – एशियाटिक सोसायटीचे **रविंद्रनाथ टागोर प्लाक.**

१९८२ – भारत सरकारकडून **नॅचरल रिसर्च प्रोफेशनशीप ऑफ ऑर्निथॉलॉजी.**

१९८३ – नॅशनल वाइल्डलाईफ फेडरेशन, यु. एस. ए. चे **आंतरराष्ट्रीय संवर्धन अॅवॉर्ड.**

१९८५ – **राज्यसभेवर सभासद** म्हणून नेमणूक.

---

डॉ. सालिम अली यांचा जन्म १२ नोव्हें. १८९६ ला मुंबईमध्ये गिरगावात झाला. ते दोन वर्षाचे व्हायच्या आतच आई-वडील गेले. त्यानंतर ते आपल्या मामाकडेच लहानाचे मोठे झाले. विद्यार्थीदशेत असताना उत्कृष्ट वर्तनाबद्दल त्यांना शाळेत एक पुस्तक बक्षिस मिळाले. त्याचे नाव होते 'आपले प्राणी मित्र'. ह्या पुस्तकामुळे त्यांच्यात प्राणी–पक्ष्यांबद्दल, त्यांच्या जीवनाबद्दल उत्सुकता, जिव्हाळा निर्माण झाला. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण 'सेंट झेवियर कॉलेज'मध्ये झाले. इ. स. १९१७ मध्ये तेहबिनाशी विवाह झाल्यानंतर तिच्या प्रोत्साहनामुळे त्यांचा पक्षीनिरीक्षणाचा छंद वाढतच गेला. प्रा. फादर ब्लॅटर हे 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी'चे सदस्य होते. त्यांच्या सहकार्याने सालिम अलींनी ह्या संस्थेत प्रवेश घेतला. 'प्रिन्स ऑफ वेल्स' म्युझियममध्येही त्यांनी मार्गदर्शक म्हणून काम केले, युरोपमध्ये अभ्यासानिमित्ताने गेले असताना तिथे त्यांनी प्रशिक्षण घेतले व भारतीय पक्षीजीवनाचा अभ्यास करणारे बर्लिन विद्यापीठातील प्राणीशास्त्राचे प्राध्यापक डॉ. एर्विन स्ट्रेसमॅन यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षीशास्त्राचा अभ्यास केला.

नंतर परत एक घटना अशी घडली की, त्यामुळे त्यांच्या एकमार्गी आयुष्यात थोडेसे बदल घडले. इ. स. १९३० मध्ये बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीची आर्थिक परिस्थिती खालावल्याने नोकरी गेली. डॉ. सालिम अली म्हणत की, त्यांच्या आयुष्यातील सर्वात चांगली घडलेली घटना म्हणजे, कायम स्वरूपाची नोकरी करण्यात त्यांना आलेले अपयश!

मुंबईनगरीच्या जवळील भागातील पक्षीनिरीक्षण व त्यानंतर त्यांनी लिहिलेल्या प्रबंधाला साऱ्या जगभर प्रसिद्धी मिळाली पक्षीनिरीक्षणाकरता स्वखर्चाने साऱ्या जगभर फिरून नंतर त्यावर पुस्तके लिहिली. 'दि बुक ऑफ इंडियन बर्डस्'च्या ५० हजारावर प्रती संपल्या. तसेच 'हॅंडबुक ऑफ इंडियन बर्डस्', 'बर्डस् ऑफ कच्छ', 'इंडियन हिल बर्डस्' वगैरे अनेक पुस्तके लोकप्रिय झाली. त्यांच्या 'पिक्टोरिअल' या पुस्तकाचा प्रकाशनसोहळा तर पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींच्या हस्ते पार पडला. 'द फॉल ऑफ अ स्पॅरो' हे त्यांचे आत्मचरित्रही प्रशंसनीय ठरले.

बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या पडत्या काळात त्यांनी संस्थेच्या मुखपत्राचे संपादक म्हणून सूत्रे स्वीकारली. एवढेच नव्हे तर त्या संस्थेला उर्जितावस्था प्राप्त करून देण्यासाठी अनेक कष्ट घेतले. शेवटपर्यंत ते या संस्थेचे अध्यक्ष होते. ह्या संस्थेने निसर्गाची पूर्णपणे काळजी वाहिली. त्यामुळे जंगली श्वापदांच्या शिकारी थांबवण्यात व निसर्गसंपत्तीचे संरक्षण करण्यात संस्थेचा मोठा वाटा आहे. अर्थातच त्याचे बहुतांशी श्रेय डॉ. अलींनाच आहे. पक्षीनिरीक्षणासाठी तर ह्या संस्थेने साऱ्या जगभरातील जंगले पालथी घातली. त्यांची

आज जग इतके क्रियाशील होत चालले आहे, पण एका बाजूने ते तेवढेच रुक्ष होत चालले आहे. आजच्या काळात सदोदित टवटवी देणारा हा सदैव ताजा असणारा विषय आहे. या विषयांत रस घेणे व त्या दृष्टीने काही कार्य करणे हीच ह्या महान् आत्म्याला श्रद्धांजली आहे.

संकलन – **उज्ज्वला नायक**